सातारा, बुधवार
१९ डिसेंबर २०१८

अमृतमहोत्सवी
पुढारी
प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

# विद्यार्थ्यांनी सैनिकी सेवेत सहभागी व्हावे : कर्नल घाडगे

**कोरेगाव : प्रतिनिधी**

सैनकी सेवा ही उत्तम सेवा आहे. जिद्द, चिकाटी व प्रयत्नांच्या जोरावर अपेक्षित यश संपादीत करता येते. आयुष्यामध्ये यश मिळवण्यासाठी कष्ट महत्त्वाचे आहेत. देश व समाजाच्या उन्नतीसाठी विद्यार्थ्यांनी सैनिकी सेवेत सहभागी व्हावे, असे प्रतिपादन कर्नल शिवाजीराव घाडगे यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या डी.पी. भोसले महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठ शहीद स्फूर्ती केंद्र, २२ महाराष्ट्र बटालियन, एनसीसी कार्यालय, सातारा, सातारा जिल्हा सैनिक कल्याण मंडळ, विजय दिवस समारोह समिती कोरेगाव, एक्स डीपीएन्स असोसिएशन व डी. पी. भोसले कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या विजय दिवस समारंभप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे होते.

प्राचार्य डॉ. कराळे म्हणाले, शहिदांनी केलेल्या बलिदानातून देशाची जडण-घडण झाली आहे. त्यांच्या बलिदानाची जाणीव ठेवून आजच्या युवकांनी देश सेवेमध्ये सहभागी व्हावे. प्रत्येकांच्या मनामनामध्ये देशप्रेम असणे गरजेचे आहे. प्रास्तविक व स्वागत रयत शिक्षण संस्थेचे सहसचिव प्रा.डॉ. विजयसिंह सावंत यांनी केले. यावेळी शहीद जवानांच्या कुटूंबीयांचा सत्कार व शौर्य पदक विजेते सुभेदार दत्तात्रय घाडगे यांचा गौरव करण्यात आला. दरम्यान, रहिमतपूरच्या दख्खनचा राजा मर्दानी खेळ पथकाने प्रात्यक्षिकांचे सादरीकरण केले.

सरस्वती इंग्लिश मिडीयम स्कूल कोरेगाव, चॅलेंज ॲकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी व आरेच्या शिवतेज माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी मल्लखांबाची विविध प्रात्यक्षिक सादर केली.

यावेळी दिलीप वलयावेट्टील, प्राचार्या जोशी, कोरेगाव तालुका आजी-माजी सैनक संघटनेचे अध्यक्ष कॅप्टन महादेव भोसले, कर्नल विष्णूपंत चव्हाण, विजयकुमार घार्गे, दिपक देवरे, पृथ्वीराज बर्गे, राजेश बर्गे आदी उपस्थित होते.

खरेदी पूर्व जाहीर नोटीस
फलटण व सातारा पंचक्रोशीमधील तमाम नागरिकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव